Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# शालेय स्तरावरील पर्यावरण व्यवस्थापन आराखडा

**Dr. Vijaya. V. Patil,**
**Asso. Professor, School of Education,**
**Y.C.M.O.U. Nashik ,**

## प्रास्ताविक:

पर्यावरण शिक्षण हया जागातिक स्तरावरील विषयाने सर्वत्र जाणीव जागृती होत आहे. पर्यावरणातील आवश्यक घटकांचा व त्यांचे परिणाम शालेय व उच्च शिक्षणातील विदयार्थ्यांपर्यंत पोहचावेत हया हेतूने शासनपातळीवर अभ्यासक्रमात पर्यावरण शिक्षणाचा समावेश करण्यात आला. भविष्यकाळातील पिढीला आवश्यक गरजादेखील मानवाला कमी पडतील अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे पर्यावरण व्यवस्थापन (Management Of Environment) करावेच लागणार आहे. औद्योगिक क्षेत्रातील विविध कारखान्यांमध्ये व्यवस्थापनातील हा महत्वाचा घटक आहे. ISO 14001 हे आतंरराष्ट्रीय पर्यावरण प्रमाणकांचा स्विकार शालेय संस्थेच्या पातळीवर व्हायला हवा. शालेय स्तरावरील पर्यावरण व्यवस्थापन आराखडयामुळे पर्यावरण व्यवस्थापनाच्या पध्दतशीर व महत्वपूर्व प्रणाली निर्माण होऊ शकेल. प्रस्तृत शोधनिबंधात शालेय स्तरावरील पर्यावरण व्यवस्थापन आराखडयाविषयी मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत.

## शानलेय स्तरावरील पर्यावरण व्यवस्थापन आराखडयाचा अर्थ: (शापव्यआ)

शालेय स्तरावरील पर्यावरण शिक्षण धोरण हे शालेय पर्यावरण व्यवस्थापनाचा आराखडा विकसनासाठी आहे. त्यासाठी काही क्लृप्त्या विकसीत कराव्या लागतात. **ISO 14001** हे गुणवत्तेचे प्रमाणकांची **(Quality Standards)** शालेय स्तरावर असणे गरजेचे नाही. पर्यावरण व्यवस्थापनाच्या प्रणालीसाठी शापव्यआ चे विकसन महत्वाची ओळख आहे.

## शापव्यआ कशासाठी ?

शालेय स्तरावर एकात्मिक प्रणाली दृष्टिकोनासाठी शापव्यआ मदत करते. पर्यावरणा विषयी आणि शाश्वत विकासातील विविध समस्यांची जाणीव जागृतीची संधी देते. हे स्थानिक स्तरावर कृतीशील होते. पण जागतिक पातळीवरचा विचार होतो. कारण शाळेच्या मैदानापासून ते घर आणि विस्तृत समाजापर्यंत पोहोचती शापव्यआ चे नियोजन खालील तीन विभागांसाठी करता येऊ शकले.

- अभ्यासक्रम – (Curriculum)

- स्त्रोतांचे नियोजन (Planning of Resources)
- शालेय मैदानांचे व्यवस्थापन (Management of School Ground)

**शापव्यआची प्रक्रीया.**

- **सहभागी:** (Participatory) हया प्रक्रीयेत विद्यार्थी, स्थल (शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, सफाई कामगार, प्रशासकिय आधिकारी, पालक, स्थानिक पर्यावरणाचे गट, आणि शासनाची विभाग) हयांचा समावेश होउ शकतो.
- **पूर्णत्वत:** (Wholistic) : पर्यावरण व्यवस्थापनात सर्व घटकांचा समावेश करून एकात्मिक दृष्टिकोण तयार होउन त्यात संपुर्ण शालेय समाज आणि अभ्यासक्रमाशी संबधित घटकांचा समावेश असू शकेल.
- **शाश्वत** (Sustainable):- पर्यावरण व्यवस्थापन हे शालेय व्यवस्थापनाचाच एक भाग राहील. तसेच सततची प्रगती (Continuous Improvement) इतर सम संस्थाबरोबरची असेल.

शाळेच्या व्यवस्थापनाच्या नियोजनामध्ये आणि अभ्यासक्रमातही शापव्यआ चा नियोजन हे ठरविलेले उद्दिष्टे साध्य करू शकतात. हया नियोजनासाठी काळजीपूर्वक कृती करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील पाय-या उपयुक्त ठरू शकता

**पायरी १ : शालेय पर्यावरण व्यवस्थापन समितीची स्थापना करणे.**

हया समितीमध्ये शालेय प्रशासन, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी असावा.

**पायरी २ : पर्यावरणीय उद्दिष्टे निर्मित करणे**

उदा. शाश्वत व्यवस्थापनाच्या कृती

**पायरी ३: खालील क्षेत्रातील उपसमित्यांची स्थापना करणे.**

- अभ्यासक्रम (Curriculum)
- स्त्रोतांचे व्यवस्थापन (Planning of Resources)
- शालेय मैदानाचे व्यवस्थापन (Management of School Ground)
- उपसमित्या : १) पर्यावरणाचे ऑडीट करणे
  २) कृती आराखडा तयार करणे

**पायरी ४ : शापव्यआ समितीकडे उपसमित्यांनी कृती आराखडा सादर करणे**

**पायरी ५ : संपुर्ण शाळेच्या शापव्यआच्या नियोजनामध्ये समितीने प्राधान्यक्रम आणि कृती आराखडा एकत्रितपणे देणे.**

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**पायरी ६ : समितीने शापव्यआ ची अंमबल बजावणी करणे.**

**पायरी ७ : समितीने शाळेच्या पर्यावरणाच्या कृतीमंधील पाय-यांचे मुल्यमापन करणे**

**पायरी ८ : शालेय वार्षिक अहवालात हया मूल्यमापनाचा समावेश करणे**

**पायरी ९ : पुढील शापव्यआ चे नियोजन करणे**

- **पर्यावरर्णीय ऑडीट**

शापव्यआ चा विकासाच्या दृष्टिने जोडणी करणे म्हणजे पर्यावरणीय ऑडीट होय. हया ऑडीटमध्ये एक प्रक्रिया असते. त्यात शालेय अभ्यासक्रमांचे मूल्यमापन करणे आणि शालेय मैदानाचे आणि स्त्रोतांच्या उपयोगांचे मापन आणि मॉनेटरींग करणे.

भविष्यळातील पर्यावरण रक्षनाच्या दृष्टिने शालेय नियोजनासाठी माहिती पुरविते.

प्रत्येक वर्षी हे ऑडीट गरजेचे नाही, परंतु शाळेमध्ये सर्वसाधारण चालणा-या अध्ययनाच्या विविध कृतीचा तो भाग असेल अभ्यासक्रमातील फलनिष्पत्तीतील प्रगती पाहता येऊ शकेल.

**ऑडीट कशासाठी ?**

शापव्यआ तील अभ्यासक्रम, व्यवस्थापन आणि शालेय मैदान अंतर्गत घटक आहेत.हया सर्वांचे ऑडीट व्हायला हवे. खालील प्रमाणे ऑडीट मधील मुख्य क्षेत्र असतील.

| | मुख्य क्षेत्रे | ऑडीट करावयाचे घटक |
|---|---|---|
| १) | अभ्यासक्रम | • पर्यावरणाच्या दृष्टिने फलनिष्पती<br>• पर्यावरण शिक्षणाचे घटक<br>• पर्यावरणाचे दिवस, आणि घटना |
| २) | स्त्रोतांचे व्यसस्थापन | • इलेक्ट्रीकसिटी आणि एनर्जी<br>• प्रयोगशाळेतील केमिकल्स इ.<br>• पाण्याचा अपण्यय. कचरा, प्लाष्टी व निरुपयोगी साहित्य. |
| ३) | शालेय मैदानाचे व्यवस्थापन | • वाळू<br>• आवाज<br>• मैदानावरील कचरा<br>मानवी वर्दळ<br>• दृक सुविधा<br>• मैदान वापरणारे<br>• बिल्डींग |

**ऑडीटचे रेकॉर्ड**

ऑडीट करण्यासाठी रेकॉर्ड ठेवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी काही नमुने (Pro-forma) तयार करणे अनिवार्य ठरते. त्यात जबाबदारीचे वाटप, केलेल्या कामाचे मूल्यमापन, पडताळा यादी व त्याप्रमाणे कार्य हयासारख्या बाबींचा समावेश असेल. समस्या, त्याप्रमाणे कृतींचे नियोजन, किमान प्रमाणके (Standards), मूल्यमापन आणि मॉनेटरींग, रीपोर्टींग आणि भविष्यकाळातील दिशा हया मुदयांचा समावेश असेल.

शालेय स्तरावरील अशाप्रकारच्या ऑडीटचा उपयोग हा पर्यावरणाच्या रक्षणासाठी होइल. विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणातील स्त्रोतांच्या वापराविषयीची जाणीव होईल. ही जाणीव विद्यार्थ्यांच्या घरापासून वैयक्तिक स्तरापर्यंत ते सामाजिक पातळीवर येऊन पोहचेल.

भविष्यकाळातील हया उर्जेचा साठा राहू शकेल. महाराष्ट्रात तरी शालेय स्तरावरील अशी प्रक्रिया व्हायला हवी. शासन पातळीवर हया विषयाची वेगळया पध्दतीने अंमलबजावणी व्हायला हवी. त्यातला हा एक भाग असावा असे वाटते.

**समारोपः**

पर्यावरण व्यवस्थापनाचा विचार हा औद्योगिक क्षेत्रात जोरात सुरू झालेला आहे. विशेषतः मल्टीनॅशनल कंपनीमध्ये काटेकोरपणे हे पाळले जाते. उदाहरणादाखल द्यावयाचे झाले तर नाशिक मधील बॉश, महेंद्र, एबीबी, क्रॉम्पटन हया कंपन्यामधील वाया जाणारे सर्व प्रकारच्या पाण्याचे शुध्दीकरण केले जाते. त्या पाण्याचा पूर्नवापरासाठी आणि बागेसाठी व इतर कामासाठी केला जातो. ध्वंनी, वायु, प्रदुषणावरही काम केले जाते. शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाची सवय लागली तरच भविष्यकाळातील फार मोठी पीढी पर्यावरणाचे रक्षण करू शकेल.

**संदर्भ :**

1) Olah Ken (2001) Implementing the environmental Education policy in your school. Retrieved on 24/9/2015 from http://www.curriculumsupport.education.nsw.gov.au/env_ed/assets/pdf/eeimplementdoc.pdf
2) Olah Ken (2001) Implementing the environmental Education policy in your school. NSW, Jenny Dibley, Brewongle Environmental education centre.